# संघर्ष क्रीडा मंडळ चिपळूण

## वार्षिक अहवाल सन २०२२ - २३

सन २०२२-२३ सालचा वार्षिक अहवाल सदर करताना आम्हाला आनंद होत आहे. या वर्षी संस्थेचा संघ विविध कबड्डी स्पर्धात सहभागी झाला. तसेच जुने व नवीन खेळाडूंसाठी प्रशिक्षण व सराव आयोजित करण्यात आले होते.

**माजी नगराध्यक्ष श्री. अशोक मयेकर नगराध्यक्ष चषक स्पर्धा.**

स्पर्धा कालावधी ०८ ते १० जानेवारी २०२३ स्पर्धेचे ठिकाण - रत्नागिरी, खुला गट, बाद फेरी या स्पर्धेतील पहिला सामना कालिकामाता मिरजोळे या संघाविरुद्ध झाला यामध्ये संघर्षाने २५ गुणांनी विजय मिळवला. पहिल्या दिवसाचा उत्कृष्ट पकडीचा मान सुरज कांबळे या खेळाडूने पटकावला. या स्पर्धेतील दुसरा सामना जय हिंद जय आबा रत्नागिरी या संघाविरुद्ध खेळविण्यात आला या सामन्यात संघर्ष क्रीडा मंडळ चिपळूण चा ७ गुणांनी पराजय झाला.

**युगांतर क्रीडा मंडळ पाग, चिपळूण स्पर्धा.**




कालावधी १३ ते १५ जानेवारी २०२३ स्पर्धेचे ठिकाण - पाग, चिपळूण, खुला गट साखळी व बाद फेरीचे सामने. गटातील साखळी फेरीचा पहिला सामना वाघजाई क्रीडा मंडळ कोळकेवाडी या संघाबरोबर झाला या सामन्यात आपल्या संघाचा बारा गुणांनी पराभव झाला. गटातील साखळी फेरीचा दुसरा सामना दापोली कर्दे या संघा बरोबर झाला या सामन्यात आपल्या संघाने १२ गुणांनी विजयी संपादन केला. गटातील साखळी फेरीचा तिसरा सामना क्रांति क्रीडा मंडळ अलोरे या संघाबरोबर झाला या सामन्यात आपल्या संघाने २१ गुणाने विजय मिळविला.

अशाप्रकारे आपल्या संघाने साखळी फेरीतील दोन सामने जिंकून बाद फेरीत प्रवेश केला. बाद फेरीतील सेमी फायनल चा सामना दसपटी क्रीडा मंडळ दसपटी या संघाबरोबर झाला या सामन्यात आपला संघ २२ गुणांनी पराभूत झाला. या स्पर्धेत आपल्या संघाला चतुर्थ क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले.

**श्री राम वरदायिनी क्रीडा मंडळ दादर चिपळूण स्पर्धा.**

कालावधी ३ ते ५ फेब्रुवारी २०२३ - ६५ किलो वजनी गट बाद फेरीचे सामने स्पर्धेतील पहिला सामना ग्रामस्थ क्रीडा मंडळ खडपोली या संघाबरोबर झाला आपला संघ सदर सामना ३० गुणांनी विजयी झाला. स्पर्धेतील दुसरा सामना श्रद्धा क्रीडा मंडळ कापसाळ या संघाबरोबर झाला आपला संघ चार गुणांनी पराभूत झाला. सदर स्पर्धेत श्री. शुभम नवरंग याला सर्वोत्कृष्ट चढायचे पारितोषिक देऊन गौरविणेत आले.

**नवतरुण मित्र मंडळ कोस्टे वाडी संगमेश्वर स्पर्धा.**

कालावधी १३ ते १५ फेब्रुवारी २०२३ ला गट बाद फेरी या स्पर्धेतील पहिला सामना संगमेश्वर क्रीडा मंडळ संगमेश्वर या संघाबरोबर झाला त्यामध्ये आपला संघ २१ गुणांनी विजयी झाला. स्पर्धेतील दुसरा आणि उपांत्य फेरीचा सामना सह्याद्री क्रीडा मंडळ साडवली, देवरुख या संघाबरोबर झाला या सामन्यात आपल्या संघाने आठ गुणाने विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. स्पर्धेतील अंतिम फेरीचा सामना दसपटी क्रीडा मंडळ दसपटी या संघाबरोबर झाला त्यामध्ये आपला संघ ८ गुणांनी पराजित झाला. आपला संघ उपविजेता म्हणून या स्पर्धेत घोषित करण्यात आला. स्पर्धेत सर्वोत्कृष्ट चढाई म्हणून शुभम नवरंग याला गौरविण्यात आले.

**प्रसाद आलेकर सायकलवीर सन्मान**

चिपळूणचा सायकल वीर व संघर्ष क्रीडा मंडळ चिपळूण चा खेळाडू प्रसाद आलेकर याचा सन्मान संघर्ष क्रीडा मंडळ चिपळून व चिपळूणचा सायकल वीर ज्याने पुणे येथे झालेली ६०० किलो मीटर बी. आर. एम. सायकलींग स्पर्धा पूर्ण करण्याचा बहुमान ज्याने पटकावला असा चिपळूण चा सायकल वीर व संघर्ष क्रिडा मंडळाचा श्री. प्रसाद दीपक आलेकर याचा त्याच्या  वाढदिवसाचे औचित्य साधून संघर्ष क्रीडा मंडळ चिपळूण च्या वतीने मंडळाचे सचिव ॲडव्होकेट श्री. विश्वजित मनोहर यादव यांच्या हस्ते  सन्मान करण्यात आला व त्याच्या पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या  त्या प्रसंगी त्यांच्या समवेत मंडळाचे खजिनदार श्री. परेश जानवलकर, सदस्य श्री. श्रीनिवास रेडीज, राष्ट्रीय खेळाडू श्री.अभिजीत सकपाळ, श्रीराज रेडीज, अमित कांबळी, जितेंद्र कदम, व सर्व खेळाडू उपस्थित होते.

यावर्षी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होताना ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांना धन्यवाद. तसेच खेळाडूंना प्रशिक्षण व सरावा दरम्यान मार्ग दर्शन करणाऱ्या प्रशिक्षकांना धन्यवाद. संस्थेला वेळोवेळी देणगी देणाऱ्या व्यक्ती संस्था यांना धन्यावाद.